EAU/ICD/2020-21-367
1st March, 2021

मसुदा

क्र.१२/२०२०—२०२१.

गोपनीय

व्यवस्थापन परिषद

# मुंबई विद्यापीठ

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२०-२०२१ मधील १२ फेब्रुवारी, २०२१ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बारावी सभा **शुक्रवार, दिनांक १२ फेब्रुवारी, २०२१ रोजी सकाळी ९:०० वाजता** व्यवस्थापन परिषदेचे दालन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, विद्यानगरी, सांताक्रुझ (पू), मुंबई – ४०० ०९८ येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर सभासद उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरु) | अध्यक्ष |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र—कुलगुरु) | सदस्य |
| ३. | प्रा. (डॉ.) अजय भामरे | सदस्य |
| ४. | प्रा. राजेश खरात | सदस्य |
| ५. | डॉ. अनुराधा मजुमदार | सदस्य |
| ६. | डॉ. कविता लघाटे | सदस्य |
| ७. | प्रा. (डॉ.) महादाप्पा गं. गोंडा | सदस्य |
| ८. | डॉ. वैभव नरवडे | सदस्य |
| ९. | डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| १०. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| ११. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १२. | डॉ. बळीराम गायकवाड (कुलसचिव) | सदस्य सचिव |
| १३. | डॉ. विनोद पाटील (संचालक,परिक्षा व मुल्यमापन मंडळ) | निमंत्रित |
| १४. | डॉ. प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |

➢ **स्वागत**

कुलसचिव तथा सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करुन सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

## ➢ अनुपस्थिती :—

श्री. दिपककुमार मुकादम आणि ॲड. निल हेळेकर यांनी त्यांची अनुपस्थिती कळविल्याने त्यांची अनुपस्थिती मंजूर करण्यात आली.

## ➢ श्रध्दांजली

### अख्तर अली

भारताचे महान टेनिस प्रशिक्षक अख्तर अली यांचे प्रदीर्घ आजाराने दिनांक ७ फेब्रुवारी, २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र. १ | मुंबई विद्यापीठाचे २०२०—२०२१ चे सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाज व २०२१—२०२२ चे अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव | मुंबई विद्यापीठाचे २०२०—२०२१ चे सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाज व २०२१—२०२२ चे अर्थसंकल्पिय अंदाजाच्या मसुदयास मान्यता देण्यात आली.<br><br>प्रभारी वित्त व लेखा अधिकारी यांनी २०२०—२०२१ चे सुधारीत अर्थसंकल्पिय व २०२१—२०२२ चे अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा सादर केला. त्यांना डॉ. अजय भामरे यांनी अनुमोदन दिले. सविस्तर चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, दि. १० फेब्रुवारी, २०२१ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बाब क्र. १ अन्वये सुधारणेसह सुचविलेल्या शिफारशीनुसार मुंबई विद्यापीठाचे २०२०—२०२१ चे सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाज व २०२१—२०२२ चे अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा मान्य करण्यात आला. सदर अर्थसंकल्पीय अंदाज महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २९ (छ) प्रमाणे अधिसभेच्या मान्यतेकरिता सादर करावा, अशी शिफारस करण्यात आली. डॉ. प्रदीप कामथेकर, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी यांना २०२०—२०२१ चे सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसूदा व सन २०२१—२०२२ चे अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा अधिसभेमध्ये सादर करण्यासाठी नामनिर्देशित करण्यात आले. | |
| बाब क्र. २ | विद्यापीठातील विविध विभाग/संस्था येथे कार्यरत असलेल्या (शासनमान्य/स्वयंअर्थसहाय्यीत) शिक्षकांना आश्वासित प्रगती योजना अंतर्गत (CAS) पदोन्नतीसाठी गठीत केलेल्या छाननी व मुल्यमापन समितीच्या अहवालाबाबत. | शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (वि.शि |

| | | |
|---|---|---|
| ठराव | विद्यापीठातील विविध विभाग/संस्था येथे कार्यरत असलेल्या शासनमान्य शिक्षकांना आश्वासित प्रगती योजना अंतर्गत (CAS) पदोन्नतीसाठी गठीत केलेल्या छाननी व मुल्यमापन समितीच्या अहवालाची नोंद घेण्यात आली व स्वयंअर्थसहाय्यीत शिक्षकांना आश्वासित प्रगती योजना अंतर्गत (CAS) पदोन्नतीसाठी गठीत केलेल्या छाननी व मुल्यमापन समितीच्या अहवालास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. ३ | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून नविन महाविद्यालये (कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, वास्तुशास्त्र ) सुरु करण्याकरीता इरादापत्र प्राप्त होण्यासाठी इच्छुक संस्थांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्याबाबत. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून नविन महाविद्यालय सुरू करण्यासाठी इरादापत्र मिळविण्याकरिता विविध संस्थांच्या, अंतिम मान्यतेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर, शासन निर्णय एन.जी.सी.–२०१७/(२९/१७) मशि – ४ दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ नुसार कार्यवाही करून छाननी समिती, तज्ज्ञ समिती, विभागाचे अभिप्राय, अधिष्ठाता मंडळ व कुलगुरूंचे अंतिम निर्णय विचारात घेऊन व्यवस्थापन परिषदेने ४७ महाविद्यालयांचे प्रस्ताव पात्र व अपात्र करून केवळ ३९ पात्र प्रस्ताव (प्रपत्र–अ प्रमाणे) सकारात्मक शिफारशीसह शासनाकडे सादर करण्याची शिफारस केली. | |
| बाब क्र. ४ | दिनांक ११ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या इमारत आणि बांधकाम समितीच्या इतिवृत्ताच्या मंजूरीसाठी सादर. | विद्यापीठ क्षेत्र विकास विभाग |
| ठराव | दिनांक ११ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या इमारत आणि बांधकाम समितीच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. या वेळेस IIFCL संदर्भात श्री. प्रदीप सावंत, श्री. राजन कोळंबेकर आणि डॉ. रविकांत सांगुर्डे आपला आक्षेप नोंदविला. | |
| | **आयत्यावेळी आलेली बाब** | |
| बाब क्र. ५ | विद्यापीठातील शिक्षकेत्तर स्थायी कर्मचा–यांसाठी २०२१–२२ या वर्षामध्ये 'वैद्यकीय गट विमा योजना' कार्यान्वित करण्याबाबत... | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | विद्यापीठातील शिक्षकेत्तर स्थायी कर्मचा–यांसाठी २०२१–२२ या वर्षामध्ये 'वैद्यकीय गट विमा योजना' कार्यान्वित करण्यासाठी डॉ. अजय भामरे, श्री. प्रदीप सावंत आणि मा. कुलसचिव यांची समिती गठीत करण्यात आली. त्यांनी सदर योजना कार्यान्वित करणेबाबत ई–निविदा प्रक्रिया राबवून सर्वात कमी दर नमुद केलेल्या कंपनीला मान्यता द्यावी, असे ठरले. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. ६ | युजीसी २०१६ च्या नियमावलीनुसार एम्.फिल. आणि पी.एच्डी. प्रवेश पूर्व परीक्षा (PET) स्प्लॅशगेन टेक्नोलॉजी पुणे (एकलव्य) या कंपनीमार्फत घेण्याबाबत. | Research Administration & Promotion Cell |
| ठराव | युजीसी २०१६ च्या नियमावलीनुसार एम्.फिल. आणि पी.एच्डी. प्रवेश पूर्व परीक्षा (PET) घेण्याची जबाबदारी MKCL ला देण्यात आली असून त्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तथापी, केवळ PET ऑनलाईन परिक्षा, स्प्लॅशगेन टेक्नोलॉजी पुणे (एकलव्य) यांच्यामार्फत घेण्यास मंजुरी देण्यात आली.<br>या परिक्षेची देय रक्कम स्प्लॅशगेन टेक्नोलॉजी पुणे (एकलव्य) यांना MKCL च्या रक्कमेतून अदा करण्यात यावी, असे ठरले. | |
| | **चर्चेच्या अनुषंगाने पारीत झालेले ठराव** | |
| क्र. ७ | विद्यापीठ अधिकार मंडळावरील निवडणुकांसाठी नियुक्त केलेल्या विद्यापीठातील/महाविद्यालयातील सेवकांना मानधन मंजूर करण्याबाबत. | |
| ठराव | विद्यापीठ अधिकार मंडळावरील निवडणुकांसाठी नियुक्त केलेल्या विद्यापीठातील/महाविद्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना मानधन देण्याबाबत श्री. राजन कोळंबेकर यांनी सादर केलेला मानधनाचा सुधारीत तक्ता तत्वत: मान्य करण्यात आला .<br>सदर तक्त्याचे अवलोकन करण्यासाठी डॉ. अजय भामरे, श्री. राजन कोळंबेकर, डॉ. वैभव नरवडे, मा. कुलसचिव आणि मा. वित्त व लेखा अधिकारी यांची समिती गठीत करण्यात आली आणि त्यांना सदर मानधन अदा करण्याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

उपकुलसचिव

प्रभारी कुलसचिव

प्र-कुलगुरू

इतिवृत्त मंजूर

कुलगुरू